२८ ४

स्वातंत्र्य सैनिकांना द्यावयाच्या
वैद्यकीय सवलतीत वाढ.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय, क्रमांक: संकीर्ण २००८/प्र.क्र.१२२/२००८/स्वासैक-१,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २४ सप्टेंबर, २००८.

वाचा : १) शासन निर्णय क्र.सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :पीओएस-१२९२/प्र.क्र.१०२/९२/स्वासैकक्ष, दि.७-८-१९९२
२) शासन शुध्दीपत्रक क्र. पीओएस-१२९२/प्र.क्र.१०२/९२/स्वासैकक्ष, दिनांक २२-१०-१९९३.

प्रस्तावना : महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांना, शासन शुध्दीपत्रक क्रमांक पीओएस १२९२/प्र.क्र. १०२/९२/स्वासैक., दिनांक २२.१०.१९९३ अन्वये क्षय रोग, कर्करोग व इतर पाच दुर्धर रोगावरील औषधोपचारासाठी रु.५,०००/- इतकी आर्थिक मदत हयातीत एकदाच देण्यात येते. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य सैनिकाला अपंगत्व आल्यास रु.५,०००/- इतके अर्थसहाय्य हयातीत एकदाच देण्यात येते. स्वातंत्र्य सैनिकांची वृध्दावस्था तसेच औषधोपचारावरील खर्चात झालेली वाढ लक्षात घेता, सदर औषधांचा खर्च स्वातंत्र्य सैनिकांच्या अवाक्या बाहेरचा आहे. त्यामुळे त्यांना सध्या देण्यात येणाऱ्या वैद्यकीय सवलती मध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- स्वातंत्र्य सैनिकांना सध्या वैद्यकीय कारणास्तव देण्यात येणारी आर्थिक मदत म्हणजे दुर्धर रोगावरील औषधोपचारासाठी तसेच अपंगत्व आल्याने त्यांच्या हयातीत एकदाच मिळणारे प्रत्येकी रुपये ५,०००/- पर्यन्तचे अर्थसहाय्याऐवजी प्रत्येक आर्थिक वर्षात रु. १०,०००/- च्या मर्यादेपर्यन्त औषधोपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरविण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे. स्वातंत्र्य सैनिकांनी शासन मान्यताप्राप्त खाजगी रुग्णालयात घेतलेल्या वैद्यकीय उपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती देखील या रु.१०,०००/- च्या मर्यादेत अंतर्भूत राहिल. यासाठी जिल्हा शल्य चिकित्सकाने त्यांच्या विहित प्रमाणपत्रात हा खर्च प्रमाणित करणे आवश्यक आहे. ही सुविधा स्वातंत्र्य सैनिकांच्या विधवांनाही अनुज्ञेय राहिल. ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी/विधवांनी दुर्धर रोगावरील औषधोपचारासाठी किंवा अपंगत्व आल्याने रु.५०००/- पर्यंतचे अनुदान यापूर्वी घेतलेले आहे, त्यांनाही सदर सवलतीचा लाभ मिळू शकेल. एका आर्थिक वर्षात अधिक वेळा औषधोपचार करुन घेण्यात आले तरी सुध्दा सदर वर्षात देण्यात येणारी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती रु.१०,०००/- च्या मर्यादेतच राहील. तसेच स्वातंत्र्य सैनिकांचा/ त्यांच्या विधवांचा समावेश शासनाच्या (सार्वजनिक आरोग्य विभाग) जीवनदायी आरोग्य योजनेत करण्यात येत आहे. त्यामुळे या योजनेंतर्गत देय होणाऱ्या वैद्यकीय सवलती स्वातंत्र्य सैनिकांना/ विधवांनाही अनुज्ञेय करण्यात येत आहेत.

२. यासाठी होणारा खर्च "मागणी क्र. ए-५,२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण,६० इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम,१०२ सामाजिक सुरक्षा योजनेखाली निवृत्तीवेतन (००) (०१)स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती इत्यादींना निवृत्तीवेतन, (२२३५००१५)" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांना वैद्यकीय सुविधांमध्ये वरील प्रमाणे वाढ केल्यामुळे येणाऱ्या अतिरिक्त खर्चाचा आढावा घेऊन आवश्यक असलेले अनुदान उपलब्ध करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी हिवाळी अधिवेशनात पुरक मागणी सादर करण्यासाठी अतिरिक्त निधीचे प्रस्ताव शासनास सादर करावेत.

(कृ.मा.प.)

३. हे आदेश शासन निर्णयाच्या दिनांका पासून लागू करण्यात येत आहेत.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक:५५४/०८/व्यय-४, दि.१७.९.२००८ अन्वये प्राप्त झालेल्या मंजूरीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक २००८०९२३१६३१५४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( स्मिता व. मंत्री )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
राज्यमंत्री, सामान्य प्रशासन यांचे खाजगी सचिव/ स्वीय सहाय्यक,
सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ स्वीय सहाय्यक,
सदस्य सचिव,स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती (पत्राने),
उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (पत्राने),
उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (पत्राने),
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ( ५ प्रती पत्राने),
सहाय्यक प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,मुंबई (पत्राने)
मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक,
अपर मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक,
शासनाचे सर्व प्रधान सचिव व सचिव यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सदस्य सचिव, जिल्हा गौरव समिती, सर्व जिल्हे,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता),नागपूर,
संचालक, लेखा वकोषागारे, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग, व्यय-४, मंत्रालय, मुंबई,
सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन-२५ (अर्थसंकल्प),
सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन १९-अ (आस्थापना),
सर्व मंत्रालयीन विभाग,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

-------------

E:\backup c\My Documents\ARG/G.R.122-08.lwp
H-2046(B) -1a.